# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ८१/२०२२**

विषय :- शासकीय कार्यालयात येताना-जाताना दुचाकी वाहन चालविणाऱ्या नागरिक / कर्मचारी / अधिकारी यांनी हेल्मेट परिधान करणेबाबत.

संदर्भ :- मा.डॉ.राजेश देशमुख, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, पुणे यांचे पत्र क्र.जा.क्र.पत्रक/१६१९/जि.र.सु.स./पुणे, दिनांक ३१/०३/२०२२.

कृपया वरील संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करावे.

सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, सर्व शाळा, कॉलेज व सर्व शासकीय यंत्रणा, यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या, दुचाकीचा वापर करणाऱ्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सूचित करण्यात येते की, शासकीय नियमांचे पालन करणे हे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचे आद्यकर्तव्य आहे. जनतेस मार्गदर्शक ठरावे यादृष्टीने तसेच स्वतःच्या व सहप्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयात येताना-जाताना अथवा कोणत्याही अन्य कामासाठी दुचाकी वाहन वापरतांना हेल्मेट वापरणे आवश्यक आहे. दुचाकी वापरतांना हेल्मेट घातलेले नसल्यास संबंधीत अधिकारी / कर्मचारी / नागरिक हे मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहतील. मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम १२९ चे उल्लंघन केल्यास त्याची गंभीर नोंद घेण्यात येईल असे, आदेश मा.जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, पुणे यांचे संदर्भान्वये निर्गमित झालेले आहेत.

तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संबंधीत सर्व अधिकारी / कर्मचारी / विद्यार्थी / विद्यार्थीनीं / नागरिक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठ आवारात येताना-जाताना अथवा कोणत्याही अन्य कामासाठी दुचाकी वाहन वापरतांना हेल्मेट परिधान करावे. दुचाकी वापरतांना हेल्मेट घातलेले नसल्यास संबंधीत अधिकारी / कर्मचारी / नागरिक हे मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील तरतुदींनुसार शिक्षेस पात्र राहतील.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे : ४११ ००७.**
**जावक क्र. सु.वि./१००/२०२२,**
**दिनांक: ०५/०४/२०२२**

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:-</u>**

०१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, } सदर परिपत्रक सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे ही
०२. मा. शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय विभाग } विनंती.
०३. मा. व्यवस्थापक, आय.टी. सेल - कृपया सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

D:\sahadev\circular\Circular Drafting.docx